# ३२) पसायदानातील सामाजिक नीतिमूल्ये

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

**किंबहना तुमचे केले । धर्मकीर्तन हें सिद्धी गेले।**
**येथ माझें जी उरलें । पाईकपण।।१७९२।।** अ. १८

पसायदानपूर्व ओवीमध्ये संतसम्राट ज्ञानोबाराय म्हणतात– 'माझे हे गीताधर्म कीर्तन सिद्धीला गेले, हे केवळ आपल्या (सद्‌गुरू आणि सर्व संतमंडळी) कृपेचे फल होय. आता करण्यासारखे एकच काम माझ्याकडे उरले आहे, ते म्हणजे आपली सेवा होय.' पसायदानातील सामाजिक नीतिमूल्ये पाहत असताना अभ्यासकांची दृष्टी जेव्हा या ओवीवर स्थिरावते, तेव्हा यात अत्यंत महत्त्वाचे एक मूल्य समजते आणि ते म्हणजे –

**निरहंकारता :**

नऊ हजार तेहतीस ओव्यांचा गीतेवर सर्वोत्तम भाष्य करणारा, एक ओवी अनुभवणाऱ्यालासुद्धा आत्मज्ञान करू देणारा असा भावार्थदीपिका हा अलौकिक ग्रंथ निर्माण करूनही माउली म्हणतात, मी काहीच केले नाही. हे सगळे आपल्याच कृपेचे फल आहे. यात आपल्याला माउलींची पराकोटीची निरहंकारता दिसून येते. गीतेत सांगितलेले तत्त्वज्ञान– कर्माचे कर्तृत्व आणि कर्मफलेच्छांचा त्याग करून– माउलींनी आपल्या कृतीतून जगाला दाखवले. अशी दिव्य कर्मे साधकाला कर्मबंधनात अडकवत नाहीत. गीतेतील चौथ्या अध्यायात भगवंत म्हणतात–

**न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।**
**इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते।।१४।।** अ. ४

यावर भाष्य करताना माउली स्वतः म्हणतात–

**हैं मजचिस्तव जाहले। परी म्यां नाही केले।**
**ऐसें जेणें जाणितले। तो सुटला गा।।८१।।** अ. ४

आणि म्हणूनच ज्ञानेश्वरी ग्रंथाचे कर्तृत्व ते स्वतःकडे घेत नाहीत. अमृताते पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेत गीतालंकार निर्माण करणारे माउली किती नम्र आहेत याची अनुभूती क्षणोक्षणी येते.

## सामाजिक एकता :

पसायदानातील प्रत्येक ओवीतून, ओवीतील प्रत्येक चरणातून, चरणातील प्रत्येक अक्षरातून आपल्याला एका–एका सामाजिक मूल्याचे दर्शन घडते. पसायदानाच्या सुरुवातीलाच माउली विश्वात्मक देवाला साद घालतात. येथे सद्गुरू, श्री गणेश अथवा आराध्य दैवत श्री विठ्ठल असा शब्दप्रयोग न करता विश्वव्यापक आणि चराचरात भरून उरलेल्या देवाकडे विश्वकल्याणाची प्रार्थना करतात. ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीला वेदांनी सांगितलेल्या आणि आत्मरूपात वसलेल्या भगवंताच्या रूपाचे वर्णन करणारे माउली शेवटी पसायदानात मात्र अत्यंत व्यापक होतात; म्हणून पसायदान म्हणजे मनुष्यत्व ते संतत्व हा जीवनप्रवास होय. खरे तर पसायदान हा 'मानवतेचा जाहीरनामा' आहे.

प्रत्येक घराघरात एकसमान चेतनतत्त्व भरलेले आहे, हे प्रतिपादन करून चेतनकारणवादातून निर्माण होणारी सामाजिक एकता पसायदानातून माउली सुरुवातीलाच अभिव्यक्त करतात. त्यातूनच मग समता, बंधुता, समरसता ही भारतीय संविधानात मांडलेली तत्त्वे निर्माण होतात. भारतीय संविधानाच्या तत्त्वांवर आधारित आहेत, तरी ही तत्त्वे पसायदानात आढळतात. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारे बंधुत्व का स्वीकारावे; मी दुसऱ्याला माझा बंधू का

मानावे, याचे उत्तर पसायदान देते. दुसऱ्यातील चेतनतत्त्व आणि माझ्यातील चेतनतत्त्व एकच आहे, म्हणून तो माझा बंधू. तो आणि मी वेगळा नाहीच, हे अद्वैत तत्त्वज्ञान लक्षात आल्यावर फक्त मानवातील बंधुत्वच नाही, तर मनुष्य व इतर सर्व यांच्यातील बंधुत्वसुद्धा लक्षात येईल. त्यासाठी ज्ञानोबारायांसारखे व्यापक व्हावे लागेल.

**हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपण जाहला।।२१३।।** अ. १२

अशा रीतीने चराचरातील अभेद सांगणारे महान तत्त्वज्ञान आपणाला विश्वात्मक या पसायदानाच्या सुरुवातीच्या व श्रीविश्वेशरावो या शेवटच्या ओवीतील संशोधनातून सहज लक्षात येते आणि आपल्या व्यापक होण्याच्या प्रवासाला सुरुवात होते.

## वाङ्मयाला वाग्यज्ञाचे स्थान :

माउलींनी निर्माण केलेल्या आपल्या वाङ्मयाला वाग्यज्ञाचे स्थान दिले आहे. खरे तर कोणतीही साहित्यकृती हे शब्दांचे संमेलन असते. परंतु पसायदानातील शब्द हे केवळ शब्द नाहीत, तर विश्वात्मक देवासाठी केलेल्या यज्ञातील आहुती आहेत. हे शब्द केवळ अक्षरांची जुळवणी नाही, तर

ते अक्षर वाङ्मय आहे. आचंद्र-सूर्य ही ज्ञानेश्वरी आणि त्यातील पसायदान विश्वाला मार्गदर्शक ठरणार आहे. ज्याच्यात हित आहे ते खरे साहित्य, या न्यायाने ज्ञानेश्वरी हे खरे साहित्य आहे. तो वाग्यज्ञ आहे. या

कृतीतून साहित्यकारांनी हा बोध घ्यावा की, आपण जे साहित्य निर्माण करतोय ते समाजाच्या खरोखर हिताचे आहे का, हे पाहिले पाहिजे. वाग्यज्ञ म्हणजे सत्यवचनरूपी यज्ञ. कोणत्याही साहित्यिकाने सत्य मांडले, तरच तो वाग्यज्ञ होऊ शकतो. केवळ मनोरंजनासाठी

नाही, तर भवभंजनासाठी सत्य प्रतिपादन करणे म्हणजे वाग्यज्ञ होय. माउलींच्याच भाषेत सांगायचे तर-

**माझिया सत्यवादाचे तप। वाचा केले बहुत कल्प।**
**तया फळांचे हे महाद्वीप। पातली प्रभु।।३२।।** अ. १६

अनेक कल्प माउलींच्या वाचेने सत्य बोलण्याचे तपाचरण केले आणि म्हणूनच त्यांच्या मुखारविंदातून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द सत्य ठरण्याची जबाबदारी ईश्वराची असते. रेड्यामुखी वेद बोलवणे, जड भिंत चालवणे, पती गेलेले असतानाही 'सौभाग्यवती भव' असे आशीर्वचन माउलींच्या मुखातून बाहेर पडताच सच्चिदानंदबाबा पुन्हा जिवंत होणे - ही सर्व उदाहरणे माउलींच्या वाग्यज्ञाची फलश्रुती आहेत. सर्वसामान्यांनी यातून एक सामाजिक मूल्य घ्यावे. ते म्हणजे, सत्य कथन. 'सत्यमेव जयते' या बोधवाक्यानुसार वर्तन करावे. साहित्यिकांनी आपले साहित्य वाग्यज्ञ करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणे अत्यावश्यक आहे.

**संतुष्टता :**

विश्वातील प्रत्येक जीवाची सुखी, संतुष्ट होण्यासाठी धडपड चालू असते; कारण त्याचे मूळ स्वरूप हे सुखस्वरूप आहे. प्रत्येक दिव्याची ज्योत ऊर्ध्वगामी असते, कारण प्रकाशाचा मुख्य स्रोत, मूळ स्वरूप सूर्य आहे. पृथ्वीवरील प्रत्येक जलप्रवाहाची ओढ ही समुद्राकडे असते, कारण त्याचे मूळ स्वरूप सागर आहे. तद्वत प्रत्येक जीव सुखाच्या- शाश्वत सुखाच्या शोधात असतो. अज्ञानामुळे त्याला स्व-स्वरूपाची, सुखस्वरूपाची जाणीव नसते म्हणून तो दुःखी असतो. पसायदान हे अज्ञानाचे आवरण दूर करून आपल्याला आपल्या मूळ सुखस्वरूपाचे दर्शन घडवते. संसारातील साधनांमुळे तात्पुरती संतुष्टता प्राप्त होते, परंतु संतांच्या आशीर्वादाने कायमस्वरूपी संतुष्टता प्राप्त होते.

पसायदानातील संतुष्टता तीन भागांत विभागली जाते. ईश्वराची संतुष्टता, जीवाची संतुष्टता आणि म्हणून माउलींची संतुष्टता. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर - माउली आपल्या वाग्यज्ञाने विश्वात्मक देवाला 'संतुष्ट व्हावे' अशी प्रार्थना करतात. भगवंत प्रसन्न झाले की, त्याकडे स्वतःच्या सुखाऐवजी किंबहुना सर्वसुखी व्हावे– तीनही लोकांतील सर्वांनी सुखी व्हावे– अशी मागणी करतात. तीन लोक म्हणजे स्वर्ग, मर्त्य आणि पाताळ. मर्त्य आणि पाताळातील लोक दुःखी असू शकतात. त्यांच्या सुखाची मागणी योग्य आहे. पण आपल्याला एक शंका येईल की, स्वर्गातील देवदेवता सुखी नाहीत का? या प्रश्नाचे उत्तर– ते सुखी आहेत, पण पूर्ण सुखी नाहीत. मानवांपेक्षा अधिक पुण्यकर्म असल्याने ते स्वर्गलोकात आहेत. पण पुण्यक्षय झाल्यावर त्यांना पुन्हा पतनाला कारणीभूत व्हावे लागते. नवव्या अध्यायात माउली म्हणतात–

**मग तया पुण्याची पाउटी सरे। सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे ।**
**आणि येऊ लागती माघारे। मृत्युलोका।।३२८।।** अ.९

तात्पर्य– माउली फक्त मानवज्ञातीसाठी पसायदान, संतुष्टता, सुख मागत नाहीत; तर तिन्ही लोकांतील प्रत्येकाच्या कल्याणाचे दान मागतात. त्यासाठी वाग्यज्ञ करतात. कारण देव थोडे का होईना भक्तांकडून घेतो आणि मगच भरभरून देतो.

उदा.– सुदाम्याच्या मूठभर पोह्याच्या बदल्यात सोन्याची नगरी करून देतो. द्रौपदीला चिंधीच्या बदल्यात अनंत वस्त्रे पुरवतो. जीव मात्र खूप घेतो आणि थोडेच देतो. काही तर कधीच देत नाहीत. संत मात्र काहीही न घेता भरभरून देतात, म्हणून संत हे जीव आणि ईश्वराहून श्रेष्ठ आहेत. वाग्यज्ञाने विश्वात्मक देवाने तोषावे, संतुष्ट व्हावे, तिन्ही लोकांतील जीवांना सुखी करावे. ही मागणी पूर्ण झाल्यावर–

**'येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला।।'**

म्हणजेच विश्वकल्याणातच माउलींचे सुख आहे. संतुष्टता आहे. कारण ते माउली आहेत. लेकरांच्या सुखातच आईचे सुख असते. परसुखाने होणारी संतुष्टता हे उच्च कोटीचे जीवनमूल्य पसायदानात आणि माउलींच्या आचरणात आढळते.

**करुणा :**

पाणी गोठते तेव्हा बर्फ तयार होतो; परंतु जेव्हा दया-करुणा गोठते, तेव्हा संतांचे अंतःकरण तयार होते. माउलींनी विश्वातील मानवाच्या दुःखाचे कारण शोधले. माणसाच्या दुःखाचे कारण स्वतःचे दुःख नसून, दुसऱ्याला मिळालेले सुख असते. माउलींनी हीच खल प्रवृत्ती, दुष्ट बुद्धी- जीवाच्या दुःखाचे मूळ कारण आहे ती सांडावी, कमी व्हावी, अशी पहिलीच मागणी केली आहे. माउलींना दुष्ट माणसांना नष्ट करायचे नाही, तर त्यांच्यातील दुष्टपणा नष्ट करायचा आहे. स्वतः भगवंत म्हणतात, 'विनाशाय च दुष्कृताम्।' म्हणजे दुष्टांचा नाश करण्यासाठी मी जन्म घेतो, असे आपल्या अवताराचे प्रयोजन गीतेतील चौथ्या अध्यायात सांगतात. त्याच भगवंताकडे माउली लोकांप्रति असलेल्या करुणा भावनेने त्यांची दुष्ट बुद्धी कमी करण्याची प्रसादभिक्षा मागतात.

एकदा एक संन्यासी महात्मा बोटीतून प्रवास करत असताना त्या बोटीतील सहप्रवासी त्यांना त्रास देतात. सुरुवातीला ते महात्मा दुर्लक्ष करतात. परंतु तरीही त्यांची त्रास देण्याची कृती कमी न होता वाढत जाते. शेवटी आपल्या भक्ताला होणारा त्रास भगवंताला सहन होत नाही. म्हणून ते महात्म्यासमोर प्रकट होतात आणि त्यांना विचारतात- ''तुम्ही यांना प्रतिकार का करत नाही?'' संन्यासी म्हणतात, ''मी क्रोधाला त्यागले आहे. यांच्यासाठी मी परत क्रोधाला का पाचारण करू?'' देव म्हणतात- ''तुला जरी क्रोधित व्हायचे नसेल तर मला सांग. मी आता ही बोट उलटी करतो, यांना जलसमाधी देतो आणि तुला वाचवतो. तू

फक्त मला सांग.'' संन्यासी महात्मा म्हणतात– ''उलटायचीच असेल तर या दुष्टांची बुद्धी पालट, नाव नको उलटवू.'' तात्पर्य– माउलींनासुद्धा अशाच खल प्रवृत्तीच्या लोकांना नाही संपवायचे, तर त्यांची दुष्ट बुद्धी संपवायची आहे.

**मुदिता :**

खल प्रवृत्ती कमी झाल्यावर मानवाची तिकडे प्रवृत्ती पुन्हा होऊ नये यासाठी त्याची सत्कर्मात रती वाढावी. सत्कर्मात त्याला आनंद मिळावा. या जीवनमूल्यास मुदिता असे म्हणतात. जीव जसाजसा दुष्ट प्रवृत्तीचा त्याग करेल तसतशी सत्कर्मात त्याची आवड वाढेल. सत्कर्मातला आनंद त्याला अधिकाधिक परमसुखाची अनुभूती देईल आणि तो तेथेच रमेल.

**मैत्र :**

मैत्रभाव हे मानवी जीवनातले खूप महत्त्वाचे जीवनमूल्य आहे. इतर कोणत्याही नातेसंबंधांपेक्षा मैत्र हे किती तरी पटीने श्रेष्ठ असते. प्रत्येकाला आपल्या व्यावहारिक जीवनातसुद्धा हाच मैत्रभाव उपयोगाला आलेला असतो. वेळप्रसंगी नातेवाईक मदतीला येत नाहीत, पण मित्र मात्र निर्हेतुक मदत करत असतो. माउलींनी म्हणूनच विश्वातील प्रत्येक जीवामध्ये हाच मैत्रभाव निर्माण व्हावा, अशी प्रार्थना ईश्वराकडे केली. विश्वाचे कल्याण करण्याची, परस्परांची सुख–दुःखे वाटून घेण्याची आणि त्यातूनच उच्च दर्जाची जीवनमूल्ये अंगीकारण्याची क्षमता मानवामध्ये निर्माण होईल..

वास्तविक पाहता मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा ही महर्षी पतंजलीऋषींनी योगसूत्रात सांगितलेली चार सूत्रे आपणास पसायदानात आढळतात. सत्कर्मात रत असणाऱ्या सुखी माणसांशी मैत्री, दुःखी

लोकांबद्दल करुणा, सात्त्विक कर्मात प्रवृत्तीमुळे प्राप्त होणारी मुदिता (आनंद) आणि पापी लोकांना पाहून त्याची उपेक्षा न करता त्यांच्याबद्दल दयाभाव माउलींच्या अंतःकरणात आढळून येतो.

सत्कार्यामुळे अंतःकरणाची शुद्धता होते आणि विश्वात्मक भावामुळेच परस्परांमध्ये मैत्र निर्माण होते. हा मैत्रभाव फक्त मानवाचा मानवाशी नव्हे, तर मानवाचा पंचमहाभूतांशीसुद्धा निर्माण व्हावा. यातूनच पर्यावरणसंवर्धनाचा अत्यावश्यक विचार पुढे येतो आणि त्यातून पर्यावरणाचा समतोल साधण्यास सुरुवात होते.

पसायदानातील प्रत्येक विचार हा शृंखलेसमान एकमेकांशी जोडलेला आढळून येतो. प्रत्येक शब्द हा पुढील शब्दाशी अर्थानुबंधाने जोडलेला आहे. सामाजिक मूल्यांची ही चढती कमान आदर्श समाजरचनेला वृद्धिंगत करण्यासाठी मदत करते. आदर्श समाजरचना निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या उच्च आदर्श विचारांचा नमुना म्हणजे पसायदान होय. ही सर्व सामाजिक मूल्ये प्रत्येक स्थळात, प्रत्येक काळात आणि प्रत्येक प्राणिमात्राला लागू पडतात. शरीराच्या पोषणासाठी जसे अन्न गरजेचे असते, तसेच समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी पसायदानातील आध्यात्मिक-सामाजिक मूल्ये पोषक आहेत. अन्न फक्त बाह्य (स्थूल) शरीराचे पोषण करते, तर पसायदानातील मूल्ये ही मनाला- अंतःकरणाला म्हणजेच सूक्ष्म शरीराला पुष्ट करतात.

**सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत्।।**

मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या अंतःकरणातील वेदकाळातील ही विश्वकल्याणाची भावना माउलींनी पसायदानात मांडली आहे. तात्पर्य- पसायदान म्हणजे वेदांतील प्रार्थनांचा आधुनिक परिपाक आहे.

### दयाभाव

'दुरितांचे तिमिर जावो' या उक्तीमध्ये माउलींच्या अंतःकरणातील दयाभाव दिसून येतो. पापात्मक अंधकार नाहीसा झाला, तरच विश्वात स्वधर्मरूपी सूर्य उदयाला येईल.

### कर्तव्याप्रति जागरूकता

समाजामध्ये प्रत्येक जण जेवढा हक्काबद्दल जागरूक असतो, तेवढा कर्तव्याबद्दल नसतो. 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' या मागणीत माउली प्रत्येकाला स्वधर्माची कर्तव्याची जाणीव करून देतात. या ठिकाणी 'धर्म' हा शब्द 'कर्तव्य' या अर्थाने आलेला आहे. प्रत्येकाने जर आपल्या कर्तव्याचे पालन केले, तर तो सूर्यासारखा तेजस्वी होईल आणि विश्वातील सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. शिक्षकाने आपल्या अध्यापनधर्माचे, विद्यार्थ्यांनी अध्ययनधर्माचे पालन केले, प्रशासन व शासनातील सर्वांनी आपापले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले, नागरिकांनी आपले मतदानाचे कर्तव्य पार पाडले; तर हे विश्व कल्याणाच्या शिखरावर पोहोचेल.

### वर्षत सकळमंगळी

या पृथ्वीतलावर अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी, उत्थानासाठी ज्यांचे पूर्णपणे उत्थान झाले आहे असे ईश्वर-उत्थित किंवा ईश्वर-साक्षात्कारी झालेल्या ईश्वरनिष्ठांच्या समुदायाने पृथ्वीवरील सर्व मानवांना भेटत राहावे. या भेटीमुळे इतर सामान्य व्यक्ती त्यांच्याकडे पाहून नैतिक आचरणाचे धडे घेतील आणि स्वतःचाही उद्धार करतील. थोडक्यात, हे महात्मे सेतूचे काम करतील. आपणास प्राप्त झालेली अनुभूती इतरांपर्यंत पोहोचवतील आणि त्यांचेही उत्थान करतील. त्यातूनच आदर्श समाजरचना तयार होईल. म्हणून ज्ञानप्राप्तीनंतर साधकाने एकांतात न राहता लोकांतात राहावे. एकांतात राहिले तर ते फक्त एकटेच उद्धरतील.

सर्वांच्या उत्थानासाठी त्यांनी पृथ्वीवर सतत भ्रमण करत राहावे.

### ईश्वरनिष्ठांची लक्षणे / वैशिष्ट्ये

ईश्वरनिष्ठांची मांदियाळी म्हणजे कल्पतरूंचे चालते-बोलते बगीचे आहेत. बगीचे हे आकर्षक असतात, मनोवेधक असतात; मनाला विसावा देणारे, रमवणारे असतात. जीवाला मन रमविण्यासाठी बागेत जावे लागते. पण येथे मात्र हे ईश्वर - उत्थित साक्षात्कारीच जीवाला भेटतात आणि त्यांचे कल्याण करतात. हे सचेतन चिंतामणींचे गाव आहे, म्हणजे संख्येने विपुल आहेत. अशा सज्जनांचे संघटन व्हावे, त्यांची गावे वसवली जावीत. एरवी विघटनासाठी सारे प्रयत्न करतात; माउली मात्र नीतिमान समाजाची गावे निर्माण करण्याचे दान मागतात. त्यांच्या मुखातून निघणारे शब्द अमृताच्या सागराप्रमाणे असतात. नाउमेद झालेल्या जीवाला जगण्याचे सामर्थ्य देतात. मरायला टेकलेल्या व्यक्तीला अमृत हे जीवन प्राप्त करून देते. येथेसुद्धा या महात्म्यांचे आश्वासक शब्द त्यांना जगण्याची नवी उर्मी देतात. हे एक प्रकारचे सकारात्मक समुपदेशनच आहे.

### वैयक्तिक आणि सामाजिक चारित्र्यसंपन्नता

### चंद्रमे जे अलांछन :

समाजाचे भले करणाऱ्यांचे व्यक्तिगत चारित्र्यही भले आहे. ते समाजाला ताप न देता सुख आल्हाद देतात. ते ज्ञानाचा प्रकाश देतात. ते उपद्रवकारक नसून उपकारक असतात. समाजाने त्यांचा स्वीकार नातेवाइकांइतका सोयऱ्याप्रमाणे करावा, आपुलकीने करावा.

### समन्वयाचे सूत्र :

ईश्वरनिष्ठांनी लोकांना भेटावे आणि लोकांनी त्यांना नातेवाइकांप्रमाणे

आपले मानावे, हे खरे समन्वयाचे सूत्र आहे. समाज हा भगवंताच्या भक्तीनेच सुखी होऊ शकेल. सर्वसाधनसुलभता असलेल्या ज्ञानोत्तर प्रेमलक्षणात्मक भक्तीचा उच्च आविष्कार म्हणजे हे पसायदान आहे. पूर्णत्वाला पोहोचल्यावरही पुन्हा भक्तीच करावी.

पसायदान हा माउलींचा विश्वव्यापक ईश्वराशी झालेला सुसंवाद आहे, सुखसंवाद आहे. हा संवाद दोघांकडूनही घडतो आहे. याची सुरुवात माउली करतात आणि सांगता परमात्म्याच्या होकाराने होते. ज्ञानेश्वरीतील पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीच्या उत्तुंग देवालयावरील कांचनाचा (सुवर्णाचा) कळस आहे. देवालयाच्या दारापर्यंत ज्यांना पोहोचता येत नाही, ते आकाशात उंचावर गेलेल्या कळसाला दुरून नमस्कार करतात. पसायदान हा ज्ञानेश्वरी ग्रंथाचा सारांश आहे. ज्ञानेश्वरीचा प्रवास हा हिरे-माणकांनी भरलेल्या रत्न-गुंफेतील प्रवास आहे. हा प्रवास संपवून आपण पसायदानापाशी येतो, तेव्हा चैत्रातील सोनेरी सकाळ आपल्याभोवती उजाडते, असे वाटते.

पसायदानातील उच्च सामाजिक नीतिमूल्ये सर्वांच्या अंगी बाणली जावीत आणि त्यातून विश्वकल्याण साधले जावे, हीच ज्ञानोबारायांच्या चरणी विनम्र प्रार्थना.

